| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|
| w'site : education.maharashtra.gov.in | Phone : (020) 2612 0361 | e-mail : doehighersec@gmail.com |


**क्रमांक शिस/उमा/आढावाबैठक/व्हीसी/ए-१/** २८५६ **दिनांक ०९/०६/२०२३**

**प्रति,**

विभागीय शिक्षण उपसंचालक,

सर्व विभाग.

**विषय :-** इ.११ वी राज्यस्तर प्रवेश नियंत्रण समितीची बैठक आयोजीत करणेबाबत.

**आढावा- दिनांक १२/०६/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वा. (व्ही.सी.)**

**यु-ट्यूब लाईव्ह- दिनांक १२/०६/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वा**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०२३-२४ मधील मुंबई महानगर क्षेत्र आणि पुणे व पिंपरी - चिंचवड, नाशिक, अमरावती व नागपूर या पांच महानगरपालिका क्षेत्रात ऑनलाईन व इतर भागात ऑफलाईन इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

त्यानुसार राज्यस्तर समितीची बैठक दिनांक १२/०६/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वा. व्ही.सी.द्वारे घेण्यात येईल. त्या संदर्भात व्ही.सी.ची लिंक स्वतंत्रपणे देण्यात येईल. बैठकीमध्ये आपण आपल्या कार्यक्षेत्रात इ. ११वी प्रवेश प्रक्रियेबाबत केलेल्या तयारीचे सादरीकरण करावे.

बैठकीच्या सुरवातीस सायंकाळी ५.०० वाजता विभागनिहाय आढावा घेण्यात येईल. तसेच सायंकाळी ५.३० वा. सदर बैठकीचे यु-ट्यूब लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यात येईल. याचा लाभ घेण्यासाठी सर्वसाधारण जनता, विद्यार्थी, पालक यांच्यासाठी यु-ट्युब लिंक संबंधितास कळवावी. या बैठकीसाठी विभागीयस्तरावरील निवडक तज्ञ विभागीय समिती सदस्य यांना सायंकाळी ५.३० पासून उपस्थित राहता येईल.

यामध्ये प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन लाईव्ह डेमो देण्यात येईल तसेच शंका निरसन घेण्यात येईल. यु ट्यूब मार्फत येणा-या शंका तसेच आपल्यास्तरावर येणाऱ्या अडचणी याबाबत चर्चा होऊन मार्गदर्शन करण्यात येईल.

गुगल मिट लिंक मर्यादित प्रशासकिय संबंधित व्यक्तिंसाठी असेल आणि **https://youtube.com/@CentralizeOnline** ही यु-ट्यूब लिंक सर्वांसाठी खुली असेल. राज्यस्तर समीतीसाठी गुगल मीट लिंक त्या दिवशी देण्यात येईल.

(हरुण आतार) ९/६

प्र. शिक्षण सहसंचालक

(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.